IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** एम.आई.डी.सी. सांगली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0095 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/04/2023 23:07

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 28/04/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/04/2023
   **Time From (वेळेपासून):** 15:23 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/04/2023 **Time (वेळ):** 22:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 025

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/04/2023 22:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कुपवाड गांव कामगार तलाठी यांचे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

10 Total value of p
(चोरीस गेलेल्या मालम

11 Inquest R

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): जितेंद्र महादेव व्हनकडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गेनरोड चर्चच्या पाठीमागे,कुपवाड ,एम.आई.डी.सी. सांगली,सांगली,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | मेनरोड चर्चच्या पाठीमागे,कुपवाड ,एम.आई.डी.सी. सांगली,सांगली,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन प्रल्हाद इंगोले | | | 1. एखतपुर,पंढरपूर तालुका, सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि. 28/04/2023

मी जितेंद्र महादेव व्हनकडे, वय-42 वर्षे, व्यवसाय-मालवाहतुक टेंपो चालक/मालक रा.मेनरोड वर्वच्या पाठीमागे, कुपवाड, ता.मिरज जि.सांगली मो.नं.7972080048

मी कुपवाड येथील राहणारा असुन माझे मालकीचा मालवाहतुक छोटा टेम्पो असुन तो मी स्वत: तसेच कामगारा करवी मालवाहतुकी करिता चालवित असतो. तसेच मी मानवी हक्क संघटना सांगली सदस्य म्हणुन सामाजिक कार्य करीत असतो. माझे मित्र निखील आठवले याचे आईचे वडील गुलाब सुदाम गाडे यांनी सन 1992 मध्ये गुंठेवारी मधील घरजागा गट नंबर 331/4 ही खरेदी पत्र करुन घेतलेली आहे. सदर जागेचे महानगरपालिकेचे गुंठेवारी प्रमाणपत्र घेतलेले आहे. परंतु जागेच्या 7/12 उता-याला नावे लावलेली नसल्याने 7/12 उता-याला नावे लावणे करिता कुपवाड तलाठी कार्यालय येथे दिनांक 13/04/2023 रोजी अर्ज दिला होता.

मी दि.27/04/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली येथील पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील साहेब यांना फोनवर संपर्क करून माझी तलाठी कुपवाड श्री.इंगोले यांचेविरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगुन आपण कुपवाड येथे येवुन माझी तक्रार घेणे बाबत विनंती केली असता पोलीस उपअधीक्षक संदीप पाटील यांनी आम्ही कुपवाड येथे येवुन संपर्क करतो असे सांगितले. त्यानंतर दुपारी 3.30 वा.चे सुमारास पोलीस उपअधीक्षक संदीप पाटील यांनी मला संपर्क करून चाणक्य चौक येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी चाणक्य चौक याठिकाणी हजर झालो असता काही वेळा नंतर पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील साहेब माझे समोर आले व त्यांनी त्यांची व त्यांचे सोबत असले दोन पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली.

त्यानंतर मी पाटील साहेब यांना माझा मित्र निखील आठवले याचे आईचे वडील गुलाब सुदाम गाडे यांनी सन 1992 मध्ये गुंठेवारी मधील सध्याचे अजिंक्यनगर कुपवाड येथील घरजागा गट नंबर 331/4 ही बबर काळु परीट जमदाडे यांचेकडुन खरेदी पत्र करुन घेतलेली आहे. सदर जागेचे महानगरपालिकेचे गुंठेवारी प्रमाणपत्र घेतलेले आहे. परंतु जागेच्या 7/12 उता-याला नावे लावलेली नसल्याने 7/12 उता-याला नावे लावणे करिता कुपवाड तलाठी कार्यालय येथे अर्ज दिला होता. मी दिनांक 27/04/2023 रोजी 12.15 वा.चे सुमारास माझे भावाचा दारिद्र रेषेखालील कार्ड रिन्युव्ह करण्यासाठी उत्पन्नाचा दाखला आणण्यासाठी तलाठी कार्यालय येथे गेलो असता तलाठी यांनी माहिती घेवुन मला उत्पन्नाचा दाखला दिला. त्यानंतर त्यांनी तुम्ही ते आठवलेच्या आजोबा गुलाब गाडे यांच्या 7/12 नोंदीसाठी अर्ज घेवुन आला होता ते काम करायचं आहे त्याचा काही तरी विषय करायला लागताय असे म्हणाले असता. मी त्यांना सर्व कागदपत्रे दिले आहेत आणखी काय कागदपत्रे द्यावी लागतील काय असे विचारले असता त्यांनी कागदपत्रे आहेत पण जुनी नोंद आहे काहीतर विषय करायला लागेल असे म्हणाले तेव्हा मी त्यांना विषय म्हणजे काय असे म्हणालो असता नोंद करायची असेल तर आठवलेंना 10,000/- रु द्यायला सांगा लगेच नोंद करुन देतो असे म्हणुन तलाठी श्री.इंगोले यांनी लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना त्यांची परिस्थिती नाही कागदपत्रे क्लियर आहेत नोंद करुन द्या असे म्हणालो असता श्री.इंगोले यांनी जुन काम काही दिल्या शिवाय होणार नाही त्यांना सांगा असे म्हणाले तेव्हा मी आठवले यांना सांगतो व दुपारी येवुन तुम्हाला भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलो. त्यानंतर मी निखील आठवले यांना तलाठी श्री.इंगोले यांनी त्यांचे कामा बाबत पैशाची मागणी केल्याचे सांगितले तेव्हा त्यांनीही त्यांची परिस्थिती नाही व त्यांनीही लाच देण्याची इच्छा नाही असे सांगितले असता पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील साहेब यांनी मला तसा लेखी अर्ज देण्यास सांगितला त्याप्रमाणे मी माझा लेखी तक्रारी अर्ज श्री.संदीप पाटील साहेब यांना दिला. पाटील साहेब यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्याप्रमाणे मी तक्रार सांगीतली. माझे तक्रारी अर्जावर पोलीस उप अधीक्षक पाटील साहेब व दोन्ही पंचानी वाचून सह्या केल्या.

त्यानंतर तलाठी कुपवाड श्री.इंगोले यांचे विरुध्द मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पाटील साहेब यांनी पंचा समक्ष दिनांक 27/04/2023 रोजी पडताळणी करण्याचे निश्चित केले. श्री.पाटील साहेब यांनी



Scanned with OKEN Scanner

मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. त्यानंतर मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला त्यानंतर मी व पंच बुजरुक असे माझे मोटार सायकल वरुन रवाना होवून तलाठी कार्यालय कुपवाड येथे तलाठी श्री.इंगोले यांची भेट घेवून परत श्री.पाटील साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो. सदर पडताळणी कार्यवाही मध्ये पाटील साहेबांनी मला व पंच बुजरुक यांना पडताळणीची हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉडींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली. त्यामध्ये तलाठी कुपवाड श्री.इंगोले यांनी निखील आठवले याचे आजोबांचे 7/12 नोंदीचे कामा संदर्भात चर्चा करुन तलाठी श्री.इंगोले यांनी "दहा... दहा सांगा... तुमच तुम्ही निर्णय घ्या" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "काय व्यवस्थीत सांगा की, तुमच तुम्ही बोला की काय ते" असे म्हणालो. त्यानंतर तलाठी इंगोले यांनी मला ह्याच्या आधी केलयच की" असे म्हणाले त्यावर मी तलाठी यांना "किती दहा हजार.....काय थोड फार कमी करा की" असे म्हणालो असता तलाठी यांनी "मी लाख रुपये मागाय लागलोय काय?......करा तुम्हाला योग्य वाटेल ते करा" असे म्हणाले. त्यानंतर मी तलाठी इंगोले यांना "पेमेंट कधी लागल तुम्हाला?" असे विचारले असता तलाठी यांनी "आता करा".असे म्हणाले. त्यावर मी "त्याच्याकडुन घेवून यायला पाहिजे ते रामकृष्णनगरला राहायला हाय" असे म्हणालो त्यावर तलाठी इंगोले यांनी "दहा सांगितल्यात लय नाय सांगितल्याल" असे म्हणाले. त्यावर मी "दहा हजार लय हुत्यात" असे म्हणालो. त्यावर तलाठी इंगोले यांनी मला "त्याच्याकडुन दहा घ्या" असे म्हणाले. त्यावर मी "किती दहा हजार घेवू?." असे म्हणुन मी "आता बघतो असल तर घेवून येतो त्याच्याकडुन... नसल तर उद्या सकाळी मी देतो" असे म्हणाले त्यावर तलाठी यांनी "उद्या सकाळी दहा वाजता... उद्याच्या उद्या आल्यावर द्या ऑपरेटरला....मी असो वा नसो" असे म्हणून कामाबाबत चर्चा करून दहा हजार रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

एकंदरीत झाले पडताळणी कारवाईमध्ये तलाठी कुपवाड श्री.इंगोले यांनी पैसे दिनांक 28/04/2023 रोजी घेवून येण्यास सांगितले असल्याने श्री.पाटील साहेब यांनी दिनांक 28/04/2023 रोजी तलाठी कुपवाड श्री.इंगोले यांच्यावर सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर मी व सापळा पथक असे अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात हजर झालो त्यानंतर पोलीस उपअधीक्षक पाटील साहेब यांनी पडताळणी कारवाई वेळची प्रक्रिया पुर्ण करुन मला तसेच दोन पंच यांना तक्रारीच्या अनुषंगाने गोपनियता बाळगुन दिनांक 28/04/2023 रोजी सकाळी 10.00 वा.अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात हजर राहणे बाबत सुचना देवुन आम्हास जाण्यास सांगितले.

दिनांक 28/04/2023 रोजी सकाळी 10.00 पोलीस.उपअधीक्षक संदीप पाटील साहेब यांनी मला सपंर्क करुन कार्यालयात हजर राहणे बाबत सांगितले असता मी पाटील साहेब यांना माझे नातेवाईक दवाखान्यात अॅडमीट आहेत त्यांचेकडे आलो आहे थोडया वेळात कार्यालयात हजर राहात असले बाबत सांगितले. त्यानंतर दुपारी 1.30 वा.चे सुमारारा अँन्टी करप्शनचे कार्यालयात हजर झालो. त्यावेळी दोन्ही पंच कार्यालया मध्ये हजर होते. त्यानंतर पाटील साहेब यांनी तलाठी इंगोले यांना लाच म्हणुन देणे करिता रक्कम आणली आहे का असे विचारले असता मी दहा हजार रुपये पंचा समक्ष हजर केले. पाटील साहेब यांनी सापळा पुर्व कारवाई करुन मी हजर केलेल्या 10,000/- रुपयामधील नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर मी, पंच व श्री.पाटील साहेब यांनी सह्या केल्या. श्री. पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे खिश्यामध्ये ठेवल्या. त्यानंतर मला दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने पाटील साहेबांनी योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्याला असले लेसव्दारे माझे गळ्यात अडकविला त्यानंतर मी व पंच बुजरुक असे रवाना होवून तलाठी कार्यालय कुपवाड येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ पाटील साहेब, पंच खलीफा व सापळा पथक असे शासकिय वाहनाने तलाठी कार्यालय कुपवाड येथे येऊन परिसरात सापळा लावुन थांबले. सापळा कारवाई दरम्यान तलाठी कुपवाड श्री.इंगोले यांचेकडे आठवले यांचे 7/12 सदरी नोंदी घालणे संदर्भात चर्चा झाली त्यावेळी तलाठी इंगोले यांनी हाताने इशारा करुन "तिथ ड्रॉव्हर मध्ये ठेवा" असे म्हणुन माझ्याकडे पैशाची मागणी केल्याने मी माझे पॅन्टेचे समोरील उजवे बाजुचे खिशातील लाच रक्कम 10,000/- रुपये माझे उजवे हाताने बाहेर काढुन "दहा सांगितल्या प्रमाणे दिल्यात" असे म्हणुन तलाठी इंगोले यांचे समोर लाच रक्कम धरली असता तलाठी इंगोले यांनी 10,000/- रुपये लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे अंगावरील पॅन्टचे पाठीमागील उजवे बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर 7/12 नोंदीच्या संदर्भात नोटीस पाठविण्या बाबत चर्चा झाली. त्यानंतर मी बाहेर येवुन माझेकडील हातरुमाल डावे हाताने बाहेर काढून हातरुमालाने तोंड पुसुन लाच स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व पाटील साहेब यांनी माझे जवळ येवून माझेकडील



Scanned with OKEN Scanner

व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून त्यांचेकडे ठेवला व मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने तलाठी कुपवाड श्री.इंगोले यांना दुपारी 16.05 वा. चे सुमारास पकडले.

सदर ठिकाणी पाटील साहेबांनी तलाठी कुपवाड श्री.इंगोले यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सचिन प्रल्हाद इंगोले, वय-38 वर्षे,तलाठी कुपवाड रा.विजयनगर कुपवाड रो, कृष्णकुंज अपार्टमेंट, फ्लॅट नं 104 सांगली मुळ रा.एखतपुर, ता.सांगोला जि.सोलापुर असे असल्याचे सांगितले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दिनांक 28/04/2023 रोजी दुपारी 15.23 वा. ते 16.05 वा. च्या दरम्यान लोकसेवक सचिन प्रल्हाद इंगोले, वय-38 वर्षे,तलाठी कुपवाड रा.विजयनगर कुपवाड रो, कृष्णकुंज अपार्टमेंट, फ्लॅट नं 104 सांगली मुळ रा.एखतपुर, ता.सांगोला जि.सोलापुर यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरुपयोग करून माझा मित्र निखील आठवले याचे आजोबा यांनी 1992 मध्ये खरेदी केलेल्या घरजागेची 7/12 सदरी नाव लावणे करिता स्वत: करीता माझेकडे 10,000/- रूपयांची लाचेची मागणी करून कुपवाड येथील तलाठी कार्यालय मधील तलाठी यांचे कक्षामध्ये माझ्याकडून 10,000/- रुपये लाच रक्कम स्वीकारली आहे. म्हणून माझी लोकसेवक सचिन प्रल्हाद इंगोले, वय-38 वर्षे,तलाठी कुपवाड रा.विजयनगर कुपवाड रो, कृष्णकुंज अपार्टमेंट, फ्लॅट नं.104 सांगली मुळ रा.एखतपुर, ता.सांगोला जि.सोलापुर यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हा दिला वदी जबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Avinash Anand Patil(I (Inspector)) / 15101000402 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Avinash Anand Patil
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 15101000402

पोलीस स्टेशन ऑफीसर
M.I.D.C. कुपवाड पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner